


भारतातील पहिल्या महिला मुख्याध्यापिका समाज सुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन तथा कोटी कोटी प्रणाम..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७२ ■ सोमवार दि.१० मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 172 ■ Monday Dt. 10 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# धस, मुंडे वादात खोक्या ढाकणे पिता-पुत्रावर झालेला गुन्हा खरा की खोटा?



बीड । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार सुरेश धस यांच्याशी जवळीक असलेल्या सतीश भोसले उर्फ खोक्या भाईने शिरुर गावातील दिलीप ढाकणे यांच्यासह त्याचा मुलगा महेश ढाकणेला मारहाण केली होती. मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सतीश भोसलेच्या अटकेची मागणी जोर धरत आहे. त्यातच ढाकणे पिता–पुत्रासह इतर दोघांविरोधात ट्रॉसिटी आणि पोक्सोअंतर्गत शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. परंतु हा गुन्हा दाखल झाल्यानंतर खोटा की, खरा अशी चर्चा सुरू झाली आहे. खोक्या अजून फरार असून, तो पोलिसांना सापडला नाही. पण त्या आधीच मारहाण झालेल्या पिता–पुत्रासह इतर दोघे असे चार जणांवर गंभीर गुन्हा दाखल झाल्याने शिरूर कासार तालुक्यात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.



## खोक्या भाईच्या घरी सापडलं शिकारीचं घबाड

दरम्यान, सतीश भोसले उर्फ खोक्याने शेकडो वन्य जीव, हरिण, काळवीट, ससे आणि मोरांची शिकार केली असल्याचा गंभीर आरोप वन्यजीवप्रेमींनी देखील केला होता. यानंतर सतीश भोसले घरी वनविभागाने छापा टाकला. सतीश भोसलेच्या घरी वन्यजीवांच्या शिकारीचे घबाड सापडले आहे. धारदार शस्त्र, जाळी, वाघूरसह आणि अनेक गोष्टी वनविभागाला आढळून आल्या आहेत. प्राण्यांचे मांस देखील पोलिसांना आढळले.

सतीश भोसले उर्फ खोक्या भाईला हरीण आणि मोरांच्या शिकारीचा शौक होता. खोक्याने आतापर्यंत साधारण २०० पेक्षा जास्त हरिणांना मारल्याचं आजूबाजूच्या गावातील लोकांचं म्हणणं आहे. याशिवाय डोंगरात वागूर (पक्षी पकडण्याचे जाळे) लावून कित्येक मोरही खाल्ले आहेत. काही दिवसांपूर्वी सतीश भोसले आणि त्याचे सहकारी दिलीप ढाकणे यांच्या शेतात हरणं पकडत होते. त्यावेळी दिलीप ढाकणे यांनी त्यांना हरणं पकडण्यास मज्जाव केला. तेव्हा खोक्या भाई आणि त्याच्या सहकाऱ्यांनी दिलीप ढाकणे आणि त्यांच्या मुलाला अमानुष मारहाण केली होती. यामध्ये दिलीप ढाकणे यांचे ८ दात पडले आहेत आणि त्यांचा जबडा फ्रॅक्चर झाला आहे. ढाकणे यांच्या मुलाचाही पाय फ्रॅक्चर झाला असून त्याला लंगडत चालावे लागत आहे. त्याच्या अंगावर वारही आहेत. यामुळे बीडमध्ये संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणात ढाकणे पिता–पुत्राने सतीश भोसले उर्फ खोक्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तसेच त्याला अटक झाली पाहिजे अशी मागणी ढाकणे कुटुंब आणि गावकऱ्यांनी केली होती. मात्र आता ढाकणे पिता–पुत्रासह इतर दोघा विरोधात ट्रॉसिटीसह पोक्सोअंतर्गत गुन्हा करण्यात आला आहे. सतीश भोसल उर्फ खोक्याला अटक न करता ढाकणे पिता पुत्रावर गुन्हा दाखल झाल्यामुळे अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. हा गुन्हा खरा की खोटा अशी चर्चा तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यात उघडपणे सुरू आहे.

## ढाकणे पिता–पुत्रावरच गुन्हा दाखल

दिलीप ढाकणे आणि त्यांचा मुलगा १९ फेब्रुवारीला पोलिसांकडे तक्रार करण्यासाठी गेले तेव्हा एपीआय धोरवड यांनी त्यांना हाकलून लावल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला होता. आमच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो, अशी भीती देखील ढाकणे पिता–पुत्राने यापूर्वी व्यक्त केली होती. आता ढाकणे पिता–पुत्रासह इतर दोघांविरोधात ट्रॉसिटी क्ट तसेच पोक्सोअंतर्गत शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी हानपुडे पाटील करत आहेत. परंतु हा गुन्हा खरा की खोटा अशी चर्चा रंगू लागली आहे.

# गेवराई तालुक्यातील नव्या पिढीची उद्योगात यशस्वी भरारी : अमरसिंह पंडित

## जालिंदर राऊत यांच्या साई श्रद्धा ट्रेडर्सचे उद्धाटन थाटात संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील नवी पिढी उद्योग व्यवसायात स्थिरावले आहे. त्यांची ही उद्योग व्यवसायातील भरारी तालुक्याला पुढे घेऊन जाईल, अर्धा मसला सारख्या ग्रामीण भागातील अक्षय जालिंदर राऊत यांनी सुरू केलेले साई श्रद्धा ट्रेडर्स हे व्यवसायिक दालन उद्योग क्षेत्रात नावारूपाला येऊन बीड आणि परिसरातील ग्राहकांना चांगली सेवा मिळेल, असे प्रतिपादन जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. बीड येथे अक्षय जालिंदर राऊत यांच्या साई श्रद्धा ट्रेडर्स आणि हार्डवेअरचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

गेवराई तालुक्यातील अक्षय जालिंदर राऊत यांनी बीड येथे साई श्रद्धा ट्रेडर्स हे दालन सुरू केले असून त्यांचा शुभारंभ रविवारी दि.०९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या उपस्थित साधू संत आणि महंतांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी श्री क्षेत्र नारायण गडचे महंत शिवाजी महाराज, पंचमुखेश्वर संस्थान भाटेपुरीचे महंत महादेव महाराज श्रावणपुरी, ज्ञानयोग प्रतिष्ठान संभाजीनगरचे माऊली महाराज दुसाने, शिंपेगाव संस्थानचे महंत हनुमान महाराज, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, सभापती मुजीब पठाण, बीड बाजार समितीचे संचालक बळीराम चव्हाण,



उपसभापती विकास सानप, माजी सभापती बाबुराव जाधव, श्रीराम आरगडे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष गणेश उगले, रिपाइंचे किशोर कांडेकर, किसान सेलचे सुनील पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते साई श्रद्धा ट्रेडर्सचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित महंतांनी शुभाशीर्वाद दिले. जालिंदर राऊत, अक्षय राऊत आणि परिवारातील सदस्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार जालिंदर राऊत यांनी मानले.




# शेतकरी आसाराम घोंगडे यांचे गेल्या तीन दिवसापासून आमरण उपोषण

बीड । प्रतिनिधी

बीडच्या गेवराई तालुक्यातील अनकोटा येथील, शेतकरी आसाराम भास्कर घोंगडे यांच गेल्या तीन दिवसापासून गावामध्ये आमरन उपोषण चालू आहे, त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत.

नदीवरील अनकोटा येथील असलेल्या कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा दुरुस्त करून नदीमध्ये पाणी साठण्याबाबत बंदरा लगतच्या दक्षिण बाजूच्या शेतकऱ्यांच्या जमिनीमधून सिंदफणा नदी प्रवाहित झाली असल्यामुळे त्या ठिकाणी कायमस्वरूपी उंच व लांब स्वरूप भिंत बांधणे बाबत व बंधारा तात्काळ दुरुस्त करणे बाबत या शेतकऱ्याचे आमरण उपोषण चालू आहे या संदर्भात गावकऱ्यांचा खूप मोठ्या प्रमाणात पाठिंबा आहे. या उपोषणाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासनाने पाठ फिरवली आहे यांची कुठली दखल घेतली नाही उपोषणकर्त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

# मागेल त्याला शेततलाव मंजूर होणार : आ.सुरेश धस

## सात वर्षानंतर होणाऱ्या पंचायत समिती आमसभेसाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

आष्टी | प्रतिनिधी

दि.१५ मार्च २०२५ रोजी आष्टी पंचायत समिती आणि दि.१६ मार्च २०२५ रोजी पाटोदा आणि शिरूर (कासार) येथे आयोजित करण्यात आलेल्या आमसभेमध्ये सर्व घटकातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे. आष्टी येथे निवासस्थानी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते ते म्हणाले सन २०१७ नंतर आष्टी पाटोदा आणि शिरूर (कासार) पंचायत समिती येथे आमसभांचे आयोजन करण्यात आले आहे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत मागेल त्या शेतकऱ्याला शेततळे मंजूर करण्यात येणार आहेत.



केंद्र शासनाच्या वतीने पूर्वी ३०–३० –३ या आकारमानाचे ६.५० लक्ष रू.किंमतीचे शेततळे मंजूर होत असत. परंतु त्यामध्ये बदल करण्यात आला असून यानंतर आता २५–२५–३ या आकाराचे ५.०० लक्ष रु. किंमतीचे शेततळे मंजूर करण्यात येणार आहेत.. मग मागणी करण्यात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला शेततळे मंजूर करण्यात येणार आहे पूर्वीच्या शेततळ्यांच्या प्रशासकीय मान्यता बदलून नवीन प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे त्याबाबतचे आदेश तीनही पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना देण्यात आले आहेत त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शेततळे करून घ्यावेत असे आवाहन करून आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सर्व योजनेतील घरकुले मंजूर करण्यात आली असून सर्व लाभार्थ्यांना पहिला हप्ता त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेला आहे मात्र आष्टी तालुक्यातील तीन आणि शिरूर (कासार) तालुक्यातील एका ग्रामपंचायत मध्ये काही लाभार्थ्यांना अडचणी निर्माण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि घरकुलाच्या यादीतील सन २०१४ नंतर प्रपत्र ड मधील दर्शवलेल्या सर्व लाभार्थ्यांना कोणताही राजकीय पक्ष अभिनिवेष ठेवता सर्व लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात येणार आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत एका गावामध्ये २० पेक्षा अधिक कामे मंजूर करता येत नाहीत त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना याबाबतचे अधिकार नसल्यामुळे त्यांच्या ऐवजी विभागीय आयुक्त यांचेकडून मंजुरी घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले आगामी काळामध्ये सर्व मजुरांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या त्यांना काम उपलब्ध करून देण्यात येईल. या आणि अशा सर्व मागण्यांबाबत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) या तीनही तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या नागरिक ग्रामस्थांनी या आम सभांमध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपले मत मांडावे असे आवाहनही शेवटी त्यांनी केले आहे.



## महिलांनी सतत कृतिशील व प्रभावात्मक राहावे : प्राचार्या गदळे

बीड | प्रतिनिधी

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील शाम विद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय मध्ये जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला यावेळी प्राचार्य जयश्री शरद गदळे बोलत होत्या याविषयी सविस्तर माहिती अशी की शाम विद्यालय व श्याम कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात नेहमी सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात होत असतात अशाच पैकी जागतिक महिला दिन ही साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली आपल्या अध्यक्षीय समारोपामध्ये बोलत असताना प्राचार्या म्हणाल्या की ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने महिलांना ३३% आरक्षण दिले आहे स्थानिक स्वराज्य शासन संस्थेत ५० टक्के आरक्षण आहे महिला ह्या हुशार आणि बुद्धिवंत आहेत बऱ्याच वेळेस असे दिसून येते की जिल्हा परिषद, पंचायत समिती नगरपरिषद ग्रामपंचायत या ठिकाणी महिला प्रतीकात्मक दिसतात त्यांनी प्रभावात्मक त्यांच्या कार्याचा ठसा निर्माण करावा. यावेळी श्रीमती कुलकर्णी मॅडम, डॉक्टर जाधवर मॅडम, ठोंबरे आयडी मॅडम, श्रीमती धनश्री मेहेत्रे मॅडम, उप प्राचार्य राजेश गंदगे, ठोंबरे बळी गुरुजी, श्री पाळवदे एन ए, बी एस मुंडे, श्री भोसले पी एस, श्री नागरगोजे, बंडू घोळवे, बीबी नागरगोजे, राजाभाऊ हंगे सर, पाखरे सर, श्री विजय राठोड, गदळे काशिनाथ, शेख जायदा भी व श्याम विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी केले तर आभार भालेराव सर यांनी मानले अशी माहिती प्राध्यापक सरपंच तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली आहे.

# जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक वेळेवर उपस्थित नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

बीड | प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बाळापूर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक उशिरा येण्याचे प्रमाण वाढले असून याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. वेळेवर वर्ग न भरल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून पालकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे शाळेच्या वेळेत बदल करण्यात आला असून, सकाळी ९ ते १२




या वेळेत शाळा भरत आहे. मात्र, बाळापूर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक वेळेवर पोहोचत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.

स्थानिक रहिवाशांच्या मते, शाळेतील काही शिक्षक नियमितपणे उशिरा पोहोचतात, त्यामुळे पहिल्या काही तासांमध्ये विद्यार्थी वाऱ्यावर सोडले जातात. अनेक वेळा पालकांनी याबाबत तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. शाळेतील व्यवस्थापनाने यावर लक्ष घालण्याची मागणी होत असून संबंधित शिक्षण विभागाने याची तत्काळ दखल घ्यावी, अशी अपेक्षा पालक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.




आज जय हिंद कॅम्पस येथे शेख निजाम मित्रमंडळातर्फे राजकीय मंथन वर कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून अमरसिंह पंडित यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात येणाऱ्या नगरपालिकेच्या निवडणुकी संदर्भात चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमात बीड शहरातील विविध पक्षातील दिग्गज मान्यवर, पदाधिकारी, पत्रकार, शिक्षक या कार्यक्रमांमध्ये उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुनीयचा शेख निजाम व शेख अमर मित्र मंडळा च्या वतीने सत्कार करण्यात आला. या कर्यक्रमास भागवत तावरे, मूसा खान, मुशताक अन्सारी, डॉ. फेरोज, काझी जफर व इतर लोक उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती अध्यक्षपदी अच्युत किरवले

सिरसाळा | प्रतिनिधी

येथे सम्राट अशोक बुद्ध विहार येथील भीमसैनिकांची साप्ताहिक वंदना घेऊन या बैठकीला सुरुवात करण्यात आली. दिनांक ९. ३ .२०२५. वार रविवार रोजी सम्राट अशोक बुद्ध विहार शिरसाळा या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त कार्यकारणी ची बैठक आयु. सुभाष जिजा चोपडे .यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले.

जयंती उत्सव समिती २०२४ च्या सर्व पदाधिकाऱ्यांचे वर्ष भर राबवलेल्या साप्ताहिक वंदना. बुद्ध जयंती .रमाई समृद्धी .न गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार .शाहू. महाराज जयंती. वृक्षारोपण. पोर्णिमा. नव बुद्धांचा सत्कार भंतेजीची धम्मदेशना. विद्यार्थी दिवस .संविधान दिन. महापरिवान दिन .भीमा कोरेगाव. दिन. व माता सावित्री जयंती. राजमाता जिजाऊ जयंती .नामविस्तार दिन. माता रमाई जयंती. छत्रपती शिवाजी महाराज जयंती. विविध आंदोलने व मोर्चे या केलेल्या कार्याबद्दल आयु. बाबासाहेब बळीराम किरवले. यांच्यावतीने पुष्पहार शाल व फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त २०२५ व १३४ व्या जयंती उत्सव समितीचे एक मताने कार्यकारणी ची निवड करण्यात आली. जयंती कमिटीचे अध्यक्ष. श्री. अच्युत बाप्पा किरवले, उपाध्यक्ष. सुरेश विष्णू उजगरे. व हर्षवर्धन चोपडे, सचिव. सुभाष जिजा चोपडे. कोषाध्यक्ष. मधुकर नाना किरवले. सह कोश्या .अध्यक्ष. सोमेश्वर किरवले. पेंटर वरील कार्यकारणीस धम्म बांधवांनी जयंती उत्सवाच्या वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी २०२४ जयंती कमिटीचे अध्यक्ष श्री. अच्युत बाप्पा किरवले. यांनी खूप असे वर्षभरासाठी योगदान दिले त्यासाठी याही वर्षी आंबेडकर जयंती साठी २०२५ जयंती उत्सव साठी परत एकदा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती कमिटीच्या अध्यक्षपदी. श्री अच्युत बाप्पा किरवले. यांची फेर निवड करण्यात आली आहे. तरी त्यांचे बौद्ध बांधवांनी व कमिटी समाजाने त्यांचे स्वागत व त्यांचा सत्कार करण्यात आला २०२४ च्या आंबेडकर जयंतीचा लेखाजोखा एक रुपयापासून ते लाखो रुपयापर्यंत हिशोब देणारे गेल्या १३ वर्षापासून एकत्रित आंबेडकर जयंती सुरुवात करण्यात आल्यापासून आजपर्यंत प्राध्यापक. धनवे सर. प्राध्यापक. साबळे सर. प्राध्यापक. झिंजुर्डे सर. सुंदर असे काम पाहत आहेत त्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे राज्यस्तरीय उत्कृष्ट गायक शाहीर पुरस्काराने सन्मानित

बीड | प्रतिनिधी

रयत सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य बीड यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी ही दिं,०९/०३/२०२५ रविवार रोजी बीड इथे पुरस्कार वितरण सोहळा हाजारोच्या संख्येत पार पडला त्या वेळी सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे हे अनेक वर्षांपासून पुर्ण महाराष्ट्र भर समाज प्रबोधन व प्रबोधनात्मक गीत गायनाचे कार्यक्रम समाजाच्या सेवैत करत असल्याने सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे यांना आजुन पुर्ण महाराष्ट्रा मध्ये त्यांनच्या गीतांच्या माध्यमातून समाज सेवा करण्यासाठी बळ यावं म्हणून शाहीर युवराज ढगे यांना काल दिं,०९/ मार्च २०२५ रविवार रोजी उत्कृष्ट शाहीर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले रयत सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने व त्या वेळी रयत सामाजिक प्रतिष्ठान च्या अध्यक्ष रोहीणी ताई गणेश माने व गणेश माने हे दोघिहि बोलत असतांना मटले की आम्ही जोपर्यंत आहेत सर्व क्षेत्रातील कलाकारांना व शैक्षणिक वैद्यकीय व महिला उद्योग विधीन्याय पत्रकारिता प्रशासकीय कृषी आणि सांस्कृतिक व आणेक क्षेत्रात करत असलेल्या सर्वांनाच उर्जा मिळावी मनुन मनुन हा पुरस्कार सोहळा प्रत्येक वर्षी मोठ्या उत्साहात होईल आसे आश्वासन दिले व सर्व पुरस्कार करत्यांना पुढिल वाटचालीस खुप खुप शुभेच्छा दिल्या व सुप्रसिद्ध गायक शाहीर युवराज ढगे यांना पुरस्कार दिल्या बद्दल आभार मानत आसतांना गायक युवराज ढगे मनाले की मला राज्यस्तरी उत्कृष्ट शाहीर पुरस्कार देऊन माझ्या वरती आजुन जबाबदारी जी टाकली आहे त्या बद्दल मी आजुन वैगानी समाज मध्ये जाऊन फुले शाहू आंबेडकर यांचे विचार पेरन्याचे मी एक नीस्ट राहुन सदैव समाज सेवा करील फक्त अपेक्षा करील की मला तुमची सेवा करायची संधी मीळो आता लवकरच दिं,१४ एप्रिल भीम जयंती एत आहे.




अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृती दिना निमित्त विनम्र अभिवादन करताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य डॉ.सुभाष राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षिरसागर, डॉ. सारिका क्षिरसागर, जिल्हाउपाध्य नितीन साखरे, नगरसेवक शुभम धुत, शहराध्यक्ष निखिल शिंदे, प्रा.लक्ष्मन गुंजाळ, नामदेव दुधाळ, मोहनराव गोरे, पाणखाडे, नितीन राऊत, धनंजय काळे, मंगेश जमदाडे, गोरख यादव, शंकर डरांगे, अजिंक्य सुरवसे, राकेश जहांगीड, संतोष यादव, आदींसह समता सैनिक उपस्थित होते.

## सुधाकरराव पाठक यांचे निधन

परळी (वै.) | प्रतिनिधी



येथील रहिवासी श्री सुधाकरराव बाबूराव पाठक (पानगावकर) यांचे ८ मार्च रोजी लातूर येथे उपचार घेत असताना अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांनी पोलीस दलामध्ये ३७ वर्षांची देताना माजलगाव, बीड, परळी, शिरसाळा, अंबाजोगाई, केज या विविध पोलीस स्टेशनमध्ये सेवा दिली होती. मार्च २००६ मध्ये सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावरून ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्यामागे आई, ४ भाऊ, पत्नी, मुलगा, सुन, चार मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. शोकाकुल वातावरणात परळी येथील स्मशानभूमी मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# विद्यार्थ्यांचे धमाल नृत्य; मुलगी वाचवा, मोबाईलचे दुष्परिणामावर नाटकातून जनजागृती

### विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने रंगले श्रीराम इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन

गेवराई | प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील लुखामसला येथील श्रीराम इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने चांगलेच रंगले. विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर करुन उपस्थित मान्यवर तसेच ग्रामस्थांची मने जिंकली. यावेळी मुलगी वाचवा, मोबाईलचे दुष्परिणामावर विद्यार्थ्यांनी नाटक सादरीकरण करुन जनजागृती देखील केली.

श्री जय शिवशंकर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित श्रीराम इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन बुधवारी मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, दैठणचे




सरपंच प्रतापसिंह पंडित, लुखामसला गावचे सरपंच रावसाहेब काळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विलास अण्णा पंडित, रमेशराव पंडित, बाळासाहेब पंडित, केंद्रप्रमुख एकनाथ नरके सर, व्हाईस ऑफ मिडीयाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष भागवत जाधव, गेवराई तालुका दक्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद नरसाळे, बीड पोलिस संतोष तांबे, श्याम चाळक सर, प्रशांत नरके, प्रशांत मस्के, राजेंद्र वाकडे सर, संतोष थोरात सर, दिलीपराव लांडगे आदींसह आलेल्या सर्व पाहुण्यांचे संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

दरम्यान कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुणवंत विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यानंतर श्री गजानना या गिताने स्नेहसंमेलनाची सुरुवात करुन यानंतर झुबी डुबी, आस्ते कदम, माऊली माऊली, बद्री की दुल्हनिया, पिचली माझी बांगडी, कोळीगीत, महाभारत, मदन मंजिरी, मेरे वाला डांस यासह मराठी लावणी, हिंदी गीते, मुलगी वाचवा व मोबाईलचे दुष्परिणाम यावर नाटीका, देशभक्ती गीते, ऐतिहासिक गीते अशी विविध गीतांवर बहारदार नृत्य सादर करत मुलांनी स्नेहसंमेलन कार्यक्रमात धमाल उडवून दिली. या कार्यक्रमाला लुखामसला, दैठण येथील ग्रामस्थ, पालक, महिला, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे संचालक गणेश तांबे, मुख्याध्यापिका सोनाली तांबे, सहशिक्षिका कु.कल्याणी सावंत, अंजली वावरे, नयन वावरे मिस, वैष्णवी वावरे, कोमल बर्गे, अश्विनी कांबळे, आईशा शेख, साक्षी पंडित यासह बळीराम खोटे, कृष्णा जोशी, कुलदीप पंडित, उमेश पंडित, निळकंठ पंडित, कृष्णा पंडित, गजानन काळे, अंगत पंडित आदींनी परिश्रम घेतले.

# शिवसंग्रामच्या वतीने पोस्टमन कॉलनी येथे महिला आरोग्य शिबिराचे आयोजन

## जागतिक महिला दिनानिमित्त शिवसंग्रामच्या वतीने आयोजित महिला आरोग्य शिबिरास उत्तम प्रतिसाद



बीड । प्रतिनिधी

संसार सांभाळत महिलांनी स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घेतली पाहिजे, असे आवाहन शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष प्रा.सुभाष जाधव यांनी केले. पोस्टमन कॉलनी, बीड येथे शिवसंग्रामच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित आयोजित महिला आरोग्य तपासणी शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिवसंग्रामचे बीड तालुकाध्यक्ष पंडीत माने, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, महिला युवती जिल्हाध्यक्ष गीतांजली डोरले, शहराध्यक्ष सुहास पाटील, शहर उपाध्यक्ष शेषेराव तांबे, युवक नेते प्रशांत डोरले, विभाग प्रमुख हरिश्चंद्र ठोसर, शैलेश सुरवसे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल गोसावी, डॉ.रूपाली सुलाखे, डॉ.शीतल सोनवणे व परिसरातील महिला व युवती मोठया संख्येने उपस्थित होत्या.

लोकनेते स्व. विनायकरावजी मेटे साहेब यांच्या संकल्पनेतून व शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसंग्रामच्या माध्यमातून विविध समाजपयोगी उपक्रम राबवणारे ठोसर दांम्पत्यांनी प्रतिवार्षाप्रमाणे याही वर्षी प्रभाग एक मधील महिला व युवतीसाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास परिसरातील महिलांनी उदंड प्रतिसाद देऊन आरोग्य तपासणी करून घेतली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना सौ.संगीता ठोसर म्हणाल्या की, आज महिला व मुली ह्या स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत नसल्याचे प्रकर्षाने जाणवते. महिला व मुलींनी आरोग्याकडे लक्ष द्यावे. एखादा आजार अंगावर न काढता वेळीच औषधोपचार घेतला तर पुढील गंभीर आजारापासून सुटका होते. अनेक घरगुती व्यापमुळे ज्या महिलांना घराबाहेर पडता येत नाही अश्या महिलासाठी महिला आरोग्य शिबिराचे आयोजन केल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्हा रुग्णालय बीडच्या वतीने उपस्थित असलेल्या वैद्यकीय अधिकारी व त्यांच्या टीमचे शिवसंग्रामचे विभाग प्रमुख हरिश्चंद्र ठोसर यांनी आभार मानले. याप्रसंगी शिवसंग्रामचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच प्रभाग एक मधील दै.रिपोर्टरचे अनंत घिगे, प्रतिष्ठित नागरिक हनुमंत सपकाळ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वंचित संघटित कामगारांच्या प्रश्नावर शेख अमर यांचे कार्य कौतुकास्पद : मस्के

## बांधकाम कामगारांना गृह उपयोगी वस्तू व सुरक्षा संच वाटप

बीड । प्रतिनिधी

शनिवार दिनांक ८ मार्च रोजी व्हीआयपी हॉल तेलगाव नाका बीड येथे महिला दिनाच्या औचित्य साधून महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने व महाराष्ट्र इमारत बांधकाम व इतर कामगार कल्याण मंडळ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने नोंदणीकृत कामगारांना गृह उपयोगी साहित्य व सुरक्षांच्या साहित्याचे वाटप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, बीड शहर प्रमुख शेख निजाम भाई यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राजेंद्र मस्के असे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून बीड शहरांमध्ये बांधकाम मुजरांना संघटित करण्याचे काम माजी नगरसेवक शेख अमर यांनी केले आहे, त्यांचे काम गरजू व वंचित कामगारांसाठी उल्लेखनीय आहे ते सातत्याने कामगाराच्या प्रश्नावर आवाज उठवण्याचे काम करत असतात मजूर कामगारांसाठी शासनाने विविध योजना पुरवल्या पाहिजेत यासाठी त्यांचा लढा सुरू असतो, त्यांच्या संघटनेच्या माध्यमातून हजारो कामगारांना एकजूट करण्याचे काम केले आहे, त्यांना देखील कामगारांनी साथ देण्याचे काम करावे असे मत राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी हजारो कामगारांना सुरक्षा संच व बृहपयोगी साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी रतन गुजर, शफिक काजी, शेख आजामभाई, बद्रीनाथ जटाळ, जयवंत वाघ, महेश सावंतसह कामगारांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

# आ. प्रकाश सोळुंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा : बाळासाहेब सोनटक्के

तेलगाव । प्रतिनिधी



माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे अनुभवी, अभ्यासु व सर्वसामान्यांना आपल्या हक्काचा आमदार असलेले प्रकाश दादा सोळके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोनटक्के यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील बहादुर मतदारांनी आपल्या हक्काचा माणुस म्हणुन प्रकाश दादा सोळंके यांना विधानसभेत पाठवले असून त्यांना मतदार संघाच्या विकासाची जाण आहे. तसेच बीड जिल्ह्यात विकासात्मक कामे करायची असतील तर दूरदृष्टीनेता व सर्वसामान्यांच्या मदतीला सतत धावुन जाणारा नेता म्हणून प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिपद देऊन जनतेची सेवा करण्याची संधी द्यावी. पक्षश्रेष्ठीने मतदारसंघ नव्हे तर बीड जिल्ह्यातील विकासाचा अनुशेष भरून काढायचा असेल तर आ.प्रकाशदादा सोळंके हे जिल्ह्यातील जेष्ठ व अनुभवी व्यक्तिमत्व आहे. जिल्ह्यातील विविध विकासात्मक कामे करण्यात तरबेज आहेत.

आज या भागातील शेतकरी, शेतमजुर, बेरोजगार, ऊसतोड कामगार समृद्ध झाला पाहिजे यासाठी आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली असुन मतदारसंघात विकासाची गंगा आणलेली आहे. म्हणून त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी त्यांना मतदानरुपी आशीर्वाद देऊन आमदार केले असून पक्षश्रेष्ठीने त्यांना मंत्रीपद देऊन त्यांच्या विकासात्मक कामाचा गौरव करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सोनटक्के यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# पशुधन पर्यवेक्षक बाबासाहेब शिंदे यांचा सेवापुर्ती समारोह

अंबाजोगाई । प्रतिनिधी



अंबाजोगाई येथे पंचायत समिती अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाना डोंगर पिंपळा येथे कार्यरत असणारे पशुधन पर्यवेक्षक बाबासाहेब शिंदे हे वय मानानुसार प्रशासकीय सेवेतून, सेवानिवृत्त झाले त्यामुळे त्यांचा सेवापुर्ती समारोह संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री पंडितराव दौंड, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. आर.डी. कदम, पशुसंवर्धन अधिकारी डॉ विजय कराड, शोभाताई सुनीलकाका लोमटे, अजय बुरांडे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ मसने, डॉ थळकरी, डॉ.मुंडे, डॉ.केंद्रे, पशु व्यवसाय संघटना अध्यक्ष डॉ.पुरणवाड, आधारचे सुनील सौंदरमल, कारखान्याचे संचालक भागवत बाप्पा देशमुख, पिपळ्याचे सरपंच पवार, डॉ. दिलीप गायकवाड, नगरसेवक सरवदे आदी होते.

यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला, तसेच उपस्थित सर्वांनी बाबासाहेब शिंदे व ज्योती शिंदे यांचा सपत्नीक सन्मान करून शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना माजी मंत्री पंडितराव दौंड म्हणाले की, अतिशय कठीण काम आहे मुक्या प्राण्यांची सेवा देणे, हे कठीण काम कशाप्रकारे सोपे करून योग्य उपचार करणं हे खूप महत्त्वाचे असते, असे काम बाबासाहेब शिंदे हे गेल्या अनेक वर्षापासूनन करतात ती नेहमी पशु सेवेमध्ये तत्पर असतात तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या तोंडी त्यांची नाव आहे ते अतिशय सुंदर सेवा देतात व इथून पुढे देत राहतील असे ते म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. आर.डी. कदम म्हणाली की, अतिशय प्रामाणिक कर्मचारी बाबासाहेब शिंदे होते. प्रत्येक काम ती नियोजनबद्ध करत त्यांनी पशु सेवेमध्ये अतिशय चांगल्या प्रकारे सेवा दिली आहे. विविध शासकीय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा काम त्यांनी केले. प्रत्येकाचा विश्वास त्यांनी संपादन केला. त्याचबरोबर व्यासपीठावरील इतर मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी बाबासाहेब शिंदे यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छांचा स्वीकार केला. यावेळी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने भव्यदिव्य असा सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमाची संचलन बालाजी येलाले तर आभार अक्षय सिरसट यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक, मित्रपरिवार यांनी पुढाकार घेतला.

# लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

लिंबागणेश । प्रतिनिधी



बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिला शिक्षिका व मातांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्र उभारणीत अनमोल योगदान देणाऱ्या महिलांची त्यांच्या अतुलनीय कार्याची माहिती प्रमुख मार्गदर्शक मुख्याध्यापक आबासाहेब हांगे यांनी दिली.

यावेळी विविध कलागुणांची जोपासना करणाऱ्या आदर्श विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला. सक्षमतेचा, कल्पकतेचा, संयमाचा, कर्तव्यनिष्ठतेचा, ममतेचा... सन्मान करण्याचा आजचा दिवस असल्याने मातापालकांचाही सन्मान करून महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. महिला दिनाचे औचित्य साधून चित्रकला स्पर्धा ही आयोजित करण्यात आली होती. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, ज्येष्ठ शिक्षक एस.बी. आगाम, बी.बी. चौरे, सहशिक्षिका श्रीमती कुलकर्णी माधुरी, माता पालक, सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर पुरी यांनी केले.

# धारूर ग्रामीण रुग्णालयात किडनी आजाराचे विशेष रोग निदान शिबिर संपन्न

धारूर । प्रतिनिधी

सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हाशल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय बीड आणि एच एल एल लाईफ केअर लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामिण रुग्णालय धारूर येथे किडनी आजाराने ग्रस्त अत्यवस्थ ५४ रुग्णांची तपासणी करण्यात आली.या शिबीराचा शुभारंभ माजी नगराध्यक्ष डॉ स्वरुप सिंह हजारी यांचे हस्ते करण्यात आला. जिल्ह्यातील प्रसिद्ध किडनी विकार तज्ञ डॉ अजित घोडके यांनी किडनी या शिबिराकरिता परिसरातील व केज, वडवणी, अंबाजोगाई, परळी तालुक्यातील ए के डी -घऊ सी के डी उघऊतसेच मधुमेह व उच्च रक्त दाबामुळे होणारे किडनीच्या आजाराने ग्रस्त रुग्णांची तपासणी करून उपचार व मार्गदर्शन केले.

या शिबिरा करीता धारूर नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा वरिष्ट डॉ. स्वरूपसिंह हजारी हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते तर शहरातील वरिष्ट पत्रकार अनिल महाजन, पत्रकार सचिन थोरात, डॉ. सचिन राऊत, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रस्तावित वैद्यकीय अधीक्षक डॉ अनिल परदेशी यांनी केले तर पत्रकार सय्यद रहीम आणि पत्रकार अतिक मोमीन यांची विशेष उपस्थिती होती. या प्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन करून जिल्ह्यातील पहिली ग्रामीण रुग्णालय स्तरावर उपलब्ध झालेली डायलिसिस सेवे बाबत समाधान व्यक्त करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. एच एच ल लाईफ केअर चे क्लस्टर हेड सागर देशमुख, डॉ शिंदे, डॉ परवेज शेख, डॉ अंरविद निक्ते, सुफियान, आकाश, गणेश आणि अफरोज सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत जागतिक महिला दिन साजरा

चौसाळा । प्रतिनिधी




जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा शाळेत जागतिक महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या मध्ये सर्व प्रथम माँसाहेब जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. जागतीक महिला दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष काकड तर प्रमुख पाहुण्या म्हणुन जेष्ठ शिक्षिका शालिनी काकडे व सर्वच महिला शिक्षिका उपस्थित होत्या. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांसह शाळेतील सर्वच महिला शिक्षिकांचा सत्कार करण्यात आला तसेच प्रत्येक वर्गातून एक मुलगी असा मुलींचाही प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात शुभेच्छापर भाषण श्री ज्ञानेश्वर मस्के, श्रीउद्धव घोडके, श्रीमती शालिनी काकडे यांची भाषणे झाली. अध्यक्षीय भाषणामध्ये श्री सुभाष काकड स्त्रियांना पूर्वी अनेक अडचणींचा सामना करावा लागला, शिक्षण, नोकरी, स्वतंत्र निर्णय घेण्याचा देखील हक्क या सारख्या मूलभूत हक्का साठी देखील स्त्रियांना लढावे लागेल,परंतु आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहेत जसे की शिक्षण, कला, क्रीडा, राजकारण, समाजसेवा, व्यवसाय, तंत्रज्ञान, अश्या एक ना अनेक क्षेत्रात स्त्रिया आपले कर्तृत्व गाजवत आहेत असे मत शाळेचे मुख्याध्यापक श्री सुभाष काकड यांनी व्यक्त केला सर्वांनी महिलांचा आदर करावा असे म्हणत सर्वच महिला व मुलींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीलक्ष्मण राऊत सर यांनी तर आभार श्री संतोष परतापुरे सर यांनी मानले. या कार्यक्रमास श्रीमती अलका गुजर मॅडम, श्रीमती माधुरी इनकर मॅडम, श्रीमती शकुंतला तांबडे मॅडम, श्रीमती मोहर जोगदंड मॅडम, श्रीमती शुभांगी जोशी मॅडम, श्रीमती उषा माने मॅडम, विजय कोळेकर सर, श्री सुधीर जाधव सर, श्री वैभव शिंदे सर यांची उपस्थिती लाभली.

# नाबार्ड व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान महिलांचा सन्मान

बीड । प्रतिनिधी



८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त नाबार्ड व महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने कर्तुत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नाबार्ड चे जिल्हा विकास प्रबंधक टी एल मारकड, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, महात्मा फुले जन आरोग्य, जिल्हा रुग्णालय चे समन्वयक डॉ. अशोक गायकवाड, माविम जिल्हा समन्वय अधिकारी एस बी चिंचोलीकर, पदाधिकारी उपस्थित होते.

जागतिक महिला दिनानिमित्त बीड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट उद्योजक महीला, स्थानिक स्वराज्य संस्था तील यशस्वी महिला सरपंच, गावपातळीवरील बचतगट प्रेरक, लोकसंचलीत साधन केंद्र च्या उत्कृष्ट कार्यकारिणी व स्टाफ यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्ये नाबार्ड चे जिल्हा विकास प्रबंधक श्री टी एल मारकड यांनी महिला दिनाचे महत्व सांगून नाबार्डने आजच्या दिनी हा कार्यक्रम महिलांच्या सन्मानासाठी आयोजित केल्याचे सांगितले. तर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी आपल्या मनोगत मध्ये देशाच्या विकासात महिलांचा सहभाग हा सर्वात जास्त म्हणजे सिंहाचा वाटा आहे, असे सांगितले.

तसेच माविम जिल्हा समन्वय अधिकारी एस.बी. चिंचोलीकर यांनी आपल्या मनोगत मध्ये असे सांगितले की, नेहमी प्रमाणेच महिला आर्थिक विकास महामंडळ हे महिलांच्या सन्मानासाठी व सक्षमीकरणासाठी पुढाकार घेऊन आपले सामाजिक कर्तव्य पार पाडते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन लेखाधिकारी गजानन ढोणे यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रकल्प सल्लागार सागर इंदूरकर, एम आय एस सल्लागार नरेश कुरापती, उचठउ मॅनेजर रामकुवर आंधळे, सविता औटे, उषा राठोड, मिना कांबळे व लेखापाल धीरज, स्वप्निल, कोमल आणि सर्व सहयोगिनी यांनी प्रयत्न केले.

# कल्याण आबुज सभापती असताना नेमकं झालं कोणाचं कल्याण

## समाजाला द्यावा लागणार परीक्षण अहवाल



माजलगाव । सुनिल थोरात

माजलगाव धनगर समाज कार्यकर्त्यांची बैठक काल आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली विधानसभा निवडणुकीमध्ये भरकटलेला समाज एकत्र करण्याचा मुख्य उद्देश असला तरी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेचे निवडणूका डोळ्यासमोर ठेवून च ही बैठक पार पडली समाज कल्याण सभापती कल्याण आबुज यांनी विधानसभा निवडणुकीत केलेली चूक माफ करून त्यांचे स्वागत प्रकाश सोळंके यांनी केले असले तरी प्रकाश सोळंके यांच्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तुल्यबळ धनगर समाज प्रतिनिधी निर्माण करण्याची क्षमता असूनही त्यांनी सिबिल कमी झालेल्या आणि धनगर समाजाच्या एनपीए कमी झालेल्या माजी सभापती कल्याण आबुज यांना वापस घेणे पसंत केले असले तरी समाज भावना लक्षात घेणे आदरणीय दादांनी गरजेचे होते अडीच वर्षाच्या सभापती काळात सभापती महोदयांनी समाज कल्याण सोडत अनेक समाजाच्या कार्यकर्त्याकडून टक्केवारी गोळा करून अनेक गावात वाद निर्माण केले होते.



गत विधानसभा निवडणुकीमध्ये कल्याण आबुज अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांच्या सोबत होते त्यामुळे सुरुवातीला त्यांनी अनेक प्रामाणिक कार्यकर्त्यांना प्रकाश दादा यांच्यापासून दूर केले होते व आता त्याच पुन्हा प्रकाश दादा सोळंके यांच्याकडे घेऊन जात त्यांचा राजकीय विनयभंग केला आहे राज्यात कैलास बोराडे प्रकरण ताज आहे आणि धनगर समाजाचे मतदारसंघात अनेक ज्वलंत प्रश्न असताना ही बैठक म्हणजे जिल्हा परिषद निवडणुकीचे डोहाळे तर नव्हे ना मुळामध्ये धनगर समाज कधी नव्हे तो २०२४ ची निवडणूक मध्ये एकवटला होता परंतु सभापती महोदयांनी या निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांना न पटणारी भूमिका घेतली होती त्यामुळे धनगर समाजाचा ऑडिट करणार बोललं जात आहे.

**माधव निर्मळ यांच्या सोबत विधानसभा निवडणुकीत काम करत असताना तुमच्या मनात खरंच निर्मळ भावना होती का**

२०२४ च्या विधानसभेसाठी जिल्हा परिषदेचे सभापती कल्याण आबुज हे पक्ष उमेदवार माधव निर्मळ यांच्यासोबत होते माधव निर्मळ यांना पस्तीस हजार मते मिळाली विधानसभा निवडणुकीपूर्वी कल्याण अबूज सक्रिय होते परंतु निवडणुकीच्या तोंडावरच कल्याण आबुज नॉट रिचेबल राहिले असल्याचे समाजामध्ये कुजबुज आहे

**खोबरं तिकडं चांगभलं करणार्या व्यक्तिच प्रकाश दादा तुम्हीच सांगा आम्ही आता कुठवर करायचं कल्याण**

२०१७ च्या जिल्हा परिषद निवडणूक मध्ये मतदारसंघामध्ये धनगर समाजाला प्रतिनिधित्व प्रकाश सोळंके यांनी दोन उमेदवार जिल्हा परिषदेचे साठी दिल्या होत्या त्यामुळे मतदारसंघातील बहुतांश धनगर समाज हा प्रकाश सोळुंके यांच्यावर माया कुरवाळून टाकत होता भाजपकडून एकही उमेदवारी मिळेल धनगर समाज प्रकाश सोळंके यांच्याबरोबर राहिलेला होता परंतु दिलेल्या उमेदवारांनी समाजाच्या हिताचे करण्यात अयशस्वी ठरले आहेत त्यामुळे खोबरं तिकडे चांगलं करणारे व्यक्तीचे कुठवर करायची कल्याण असा सवाल सामान्य धनगर समाज करतोय.

**प्रकाश सोळंके यांचे प्रामाणिक काम करणाऱ्या सुशिक्षित प्रमाणीक धनगर समाज कार्यकर्त्यांचा प्रकाश दादा यांना खडा सवाल**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत प्रामाणिक धनगर समाज कार्यकर्ता असल्या बैठकीमुळे होरपळत चाललेला आहे. २०१९ चे निवडणुकीपासून मतदार संघातील बहुतांश धनगर समाज हा प्रकाश सोळंके यांच्या बरोबरच राहिलेला आहे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जातीवादी समीकरणांमध्ये सुद्धा अनेक धनगर बहुल भागातून प्रकाश दादा सोळंके यांना चांगले मतदान पडले आहे परंतु अनेक प्रामाणिक कार्यकर्त्यांचा असल्या बैठकीमुळे जीव घुसमटत आहे.

## शासकीय गोदाम हमालाचे पेमेंट रखडल्यामुळे लाक्षणिक उपोषण



तलवाडा । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शासकीय गोदाम हमलाचे गेल्या सहा महिन्यापासून पेमेंट थांबल्या मुळे आज त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे गेवराई तहसील कार्यालयावर सर्व शासकीय धान्य गोदाम हमाल पंचायत संघटनेच्या वतीने लाक्षणिक उपोषण करून नायब तहसीलदार मोरे यांना निवेदन देण्यात आले आहे

**■ हमालाचे सहा महिन्याचे पेमेंट थांबले, हमालावर उपासमारीची**

**■ गेवराई येथील संघटनेने दिले तहसीलदार यांना निवेदन**

त्यानी दिलेले निवेदन म्हटले आहे की, जिल्ह्यातील शासकीय गोदाम तील वारंवार मागणी पुरवठा विभागाकडे करून फक्त बिन कामाचे पत्र देऊन हमाला सारखे कश्टकरी यांची बोळवण करण्याचा प्रयत्न केला जात आहे एक सप्टेंबर २०२४ पासून सहा महिन्याचे पेमेंट रखडले आहे या पेमेंट साठी तात्काळ मंजुरी देण्यात यावी शासनाने आदेश देऊनही १ व २ टप्पा हम्लातील काम नोंदी असलेले हामाला काम करून घेतले जात नाही ते तात्काळ करून घेण्यात यावी

दोन वर्षा पासुन मा. उच्च न्यायालयाने सहा आठवड्यात महागाई निर्देशांकाचा फरक देण्याचा आदेश येऊनही अद्याप दिला नाही तो तात्याल देण्यात यावा बीड शहर गोदामातील हामालाचे जे काम होते तेवढेच त्याच्या कदून घेण्यात यावे जोपर्यंत मागणी मान्य होत नाही तोपर्यंत शासकीय धान्य गोदाम हमाल पंचायत संघटनेने काम बंद केले आहे

निवेदन देण्यासाठी तालुक्यातील संघटनेचे विठ्ठल धापसे, विलास, हातागळे, प्रशांत जाधव, सचिन वाघ, बाळू राठोड, रमेश दाभाडे, अण्णासाहेब जाधव, सुरेश बाराखडी, बंशी हातागळे, भाऊजी कोळी, ज्ञानेश्वर राठोड, अण्णा गायकवाड, अतुल गायकवाड, संजय मोरे, अनिल मते, शेख सरतज, तुरुकमारे सूरज, तुरुक्कमारे संतोष, अरुण बनसोडे, आठवले रवी, शेख जावेद, डोंगरे रणजित, भोले दिलीप, शेख लतिफ, डोंगरे मुरली, शैख इस्राईल, माने बळीराम, शेख शहनशा, आदींनी सह्या चे निवेदन नायब तहसीलदार यांना दिले आहे.

## एसपी नवनीत काँवताचा दणका

### तीन जणांवर वादग्रस्त पोस्ट प्रकरणी गुन्हे दाखल

बीड । प्रतिनिधी

सोशल मिडीयावर (फेसबुक, इंन्स्टाग्राम, द, वॉटसअॅप, टेलीग्राम, ई.) सार्वजणीक मालमत्तेचे नुकसान व जिवतीस धोका निर्माण होईल या उद्देशाने तसेच दोन भिन्न गटातमध्ये शत्रुत्व वाढुन एकोपा टिकण्यास बाधक होईल या उद्देशाने प्रक्षोभक/भडकाऊ व आक्षेपार्ह मजकुर (पोस्ट) प्रसारित केला आहे. आक्षेपार्ह मजकुर (पोस्ट करणारे) प्रसारित करणारे समाजकंटक यांनी केलेल्या गैरकृत्याची गंभीरतेने दखल घेण्यात आली असुन त्यांचे विरुध्द सायबर पोलीस स्टेशन, बीड येथे १) गुरनं १२/२०२५ कलम ५७, १९२, १९६ इछ्ड सह कलम ६६ माहिती तंत्रज्ञान अधिनियम २) गुरनं १३/२०२५ कलम ५७, १९२, १९६ इछ्ड सह कलम ६६ माहिती तंत्रज्ञान




अधिनियम ३) गुरनं १४/२०२५ कलम ५७, १९२, १९६ इछ्ड सह कलम ६६ माहिती तंत्रज्ञान अधिनियम प्रमाणे गुन्हे नोंद झाले आहेत.

नमुद गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर साहेब व मा. उपविभागीय पोलीस अधीकारी श्री विश्वंबर गोल्डे साहेब यांचे मार्गदशनाखाली पोलीस निरीक्षक देवीदास गात, सायबर पोलीस स्टेशन हे करत आहेत.

सर्व समाजातील सुजान नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा कोणत्याही अफवावर व वेगवेगळया समाजमाध्यमांतुन प्रसारित होणाऱ्या खोटया व द्वेषमुलक, सामाजिक सौदाई, शांतता बिघडवणाऱ्या बातम्यावर विश्वास ठेवु नये. अशा प्रकारे खोडसाळ, आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत केल्यास त्यांचेवर गुन्हे नोंद करुन कायदेशिर कठोर कारवाई करण्यात येईल. सायबर पोलीस ठाणे व बीड जिल्हा पोलीस सोशल माध्यमावर आक्षेपार्ह पोस्ट करणारे समाजकंटक यांचेवर बारकाईने लक्ष ठेवुन आहेत.

## डॉ. पद्मश्री सिंधुताई सपकाळ सेवारत्न पुरस्कार जाहीर : जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी स्त्री–शक्ति प्रतिष्ठान बीड आणि पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोह यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिलादिनाचे औचित्य साधून समाजातील सामाजिक शैक्षणिक, राजकीय,कला क्रिडा संस्कृतीक उद्योग व्यावसायिक क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्या महिला आणि मुलींना दिल्या जाणाऱ्या पद्मश्री डॉ.



सिंधुताई सपकाळ सेवारत्न पुरस्कार निवड समितीने जाहीर केले असून प्रियंका नामदेव मुंडे, मनीषा अरुण भोज, संगीता ताई धसे, नलिनी संतोष देशमुख, डॉ राधा तांबे, प्रियंका प्रशांत तोष्णीवाल, लता जाधव, नयना राम कुलकर्णी, कांता तात्या बांगर, संध्या अरूण घुगे, विनीता लोकरे, आयेशा शेख, रत्नमाला बावळे, संजिवनी जावळे, अंजली शेळके, अझमत सुलतान शेख अन्वर इकबाल यांना दि.११ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता पसायदान सेवा प्रकल्पाच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असल्याची माहीती आयोजक सौ. जयश्री विलास विधाते आणि सौ. रंजना गोवर्धन दराडे यांनी दिली.

## महिला सक्षमीकरणासाठी येडेश्वरी फाऊंडेशन काम करेल : खा.सोनवणे

### येडेश्वरी फाऊंडेशनच्या कार्यालयाचे महिला दिनी उद्घाटन, कर्तृत्ववान महिलांचा केला सन्मान

केज । प्रतिनिधी

शासनाने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. परंतु त्यातून महिलासक्षम होणार नाहीत. तर महिला सक्षमीकरणासाठी रोजगार निर्मीती करणे आवश्यक आहे. हा उद्देश ठेवून आपण येडेश्वरी फाऊंडेशनच्या माध्यमातून महिलांना रोजगार निर्मीती करून देण्याचे काम करणार आहोत. सुरूवातीला केज आणि आगामी काळात जिल्हाभरात हा प्रयोग करू, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले.




दि.८ मार्च जागतिक महिला दिनानिमीत्त केजमध्ये येडेश्वरी फाऊंडेशन कार्यालयाचा उद्घाटन सोहळा खा.बजरंग सोनवणे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी कर्तृत्ववान महिलांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष संजीवनी देशमुख, पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर चौरे, नसरीन बागवान, अनिता कांबळे, नगरसेवक भाऊसाहेब गुंड, दलील इनामदार, सय्यद शरीफ, सरपंच बप्पा डोंगरे, बबन जाधव, श्रीकांत घुले, मुन्ना चालक, संभाजी लोमटे, शितलताई लांडगे यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले की, महिलांच्या बाबतीत काम करताना येडेश्वरी फाऊंडेशनची पुर्ण जबाबदारी शितलताई लांडगे यांच्यावर दिलेली आहे. या फाऊंडेशनच्या माध्यमातून महिलांसाठी शिवण क्लास, छोटे–छोटे बचतगटाच्या माध्यमातून व्यवसाय, पापड उद्योगापासून ते अनेक उद्योग यातून करता येतील. यातून पैसे उभा करणे आणि घर चालविता येतील. या फाऊंडेशनच्या माध्यमातून बचत गटासाठी प्रशिक्षण किंवा मार्गदर्शन आणि सहकार्य केले जाईल. पहिला प्रयोग हा केज मधून करत आहोत. सुरूवातीला सहा महिन्यात केजमध्ये जाळे निर्माण करू, यानंतर बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावात फाऊंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करू. हे करण्यासाठी दहा ते पंधरा लोक एकत्रित पणे काम करतील. पक्ष, संघटना आणि राजकारण बाजुला ठेवून, गरजू महिलांसाठी रोजगार निर्मीती करू. एक चांगल्या उद्देशाने आपण सर्वांनी हे काम करून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करायचे आहेत. आपण सर्वजण या कामासाठी पुढे याल, असा विश्वास आहेच पण त्यासाठी आपला वेळही द्या, असे आवाहनही खा.बजरंग सोनवणे यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT